# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 193/2022 दिनांक : 11.05.2022

# 1)घरफोडी :–

**1)ईस्लापुर :–** दिनांक 10.05.2022 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास, **मौ. कोल्हारी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील हा दिवसभर काम करून रात्री मुलाबाळासह झोपला असता कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे दाराचे कवाड उचलुन हुकातुन काढुन आत प्रवेश करून घरातील प़त्राचे पेटी मध्ये ठेवलेले नगदी 40,000/–रू दहा तोळे चांदीचे कडे किंमती 5,000/–रूपयाचे असा एकुण 45,000/–रूपयाचा ऐवज चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी गंगाधर कोंडीबा गडपाले, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती/मिस्त्री रा. कोल्हारी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 48/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री तोडेवाड, मो.क्र. 8080308059** हे करीत आहेत.

**2)ईस्लापुर :–** दिनांक 10.05.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **मौ. कोस्मेट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी यांचे घरातुन दाराचे कवाड चौकटीचे हुकातुन काढुन आत प्रवेश करून खोलीत झोपलेल्या आजीच्या गळयातील सोन्याचे मणी मंगळसुत्र चंपुलाची एक तोळयाची पोत किंमत 35,000/–रूपयाची जुनी वापरती कशाने तरी कापुन चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी विशाल मारूती बोडेवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. कोस्मेट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 49/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री तोडेवाड, मो.क्र. 8080308059** हे करीत आहेत.

**3)लोहा :–** दिनांक 10.05.2022 रोजी चे 02.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. बोरगाव आ. ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घरात प्रवेश करून गोदरेज लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने किंमत 73,000/–रूपयाचे चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी आबाजी खुशबराव सुरनर, वय 25 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. बोरगाव आ. ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 104/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2325 किरपणे, मो.क्र. 9881708474** हे करीत आहेत.

# 2)मो. सा. चोरी :–

**1)लिंबगाव :–** दिनांक 08.05.2022 रोजी चे 21.00 ते 21.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या घरा जवळुन मौ. कोटीतीर्थ ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर प्लस कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/एस–7754 किमती 10,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी विजय शिवाजी वाघमारे, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. कोटीतीर्थ ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 78/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जहागीरदार, मो.क्र. 9822337382** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 06.05.2022 रोजी चे 22.00 ते दि. 07.05.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोरून शारदा नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बजाज पल्सर कंपणीची मो सा क्रं टीएस–25/ए–9521 काळया रंगाची किंमती 70,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने नमुद ठिकाणावरून चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल समीर अब्दुल अजीज, वय 23 वर्षे, रा. शारदानगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 231/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1636 मिरदोडे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**3)किनवट :–** दिनांक 05.05.2022 रोजी चे 07.30 वा. चे सुमारास, **हनुमान मंदीर शिवाजी चौक किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपणीची मो सा क्रं टीएच–01/इ–7767 किंमती 40,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने नमुद ठिकाणावरून चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी स्वामी नारायण म्यापुलवार, वय 47 वर्षे, रा. रामनगर किनवट ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 85/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1326 चौधरी, मो.क्र. 9158134034** हे करीत आहेत.

**4)उमरी :–** दिनांक 08.05.2022 रोजी चे 21.00 ते दि. 09.05.2022 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या घरा समोर शिक्षक कॉलनी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मो सा क्रं एमएच–26/बीव्ही–0427 किंमती 80,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने हॅण्डल लॉक तोडुन नमुद ठिकाणावरून चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सय्यद जीमल पि. सय्यद शाहिन, वय 33 वर्षे, व्यवसाय पानशॉप रा. क्षिक्षक कॉलनी उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 125/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1691 कदम, मो. क्र. 9284686157** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**मुखेड :–**दिनांक 10.05.2022 रोजी चे 03.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावर मौ. दापका राजा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने त्यांचे शेतातील आखाडयावर जनावरे बांधुन घरी गेला असता यातील आरोपीतांनी फिर्यादीचे आखाडयावर बांधलेली एक म्हैश, एक वगार, एक कारवड असे चोरून नेत असतांना मिळुन आले. व माणसाचा मृत्यु किंवा दुःखापत होईल याची जाणीव असताना उदेश पुर्वक फिर्यादीचे आखाडयावर असलेल्या लोखंडी बाजेला विद्युत तार जोडली. तसेच या पुर्वी देखील फिर्यादीचे शेतातील आखाडयावर सोयाबीनची गुळी, कडबा, जाळुन तसेच शेतातील आखाडयावर बसवलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करून नुकसान केले. वगैरे **फिर्यादी अरूण शंकरराव जोगदंड, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. दापका राजा ता. मखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 147/2022 कलम 379, 511, 440, 427, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री काळे, मो. क्र. 9850072078** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 09.05.2022 रोजी चे 21.30 वा. चे सुमारास, **हिंगोली गेट ब्रिज खाली चांदभाई यांचे हॉटेलच्या बाजुला नांदेड येथे,** यातील आरोपी राधेचा मित्र याने फिर्यादी जवळील रूमाल मागीतले असता फिर्यादी यांने रूमाल देण्यास नकार दिल्याने यातील राधेचा मित्र याने त्याचे जवळील चाकु काढुन फिर्यादीच्या डाव्या कानाच्या खाली गळयावर मारून गंभीर दुःखापत करून आरोपी पळुन गेला. वगैरे **फिर्यादी शेख तौफिक शेख छोटुमिया, वय 23 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सुनेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 162/2022 कलम 326, भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री गोविंद जाधव, मो. नं. 9823352701** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी :–**दिनांक 08.05.2022 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **मौ. हारणवाडी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तु तुझ्या फोनवरून कोणासही फोन लावुन देत आहेस व आमची माहिती देत आहेस तसेच मागील किरकोळ वादावरून आरोपी क्र 1 याने काठीने फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर दुःखापत केली. आरोपी क्रं 2 याने काठीने फिर्यादीचे पाठीत व डाव्या पायाच्या नळीवर मारून जखमी केले आरोपी क्रं 3 याने दगडाने फिर्यादीस व साक्षीदारास मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रभाकर किशनराव पांचाळ, वय 30 वर्षे, व्यवसाय सुतारकाम रा. हारणवाडी ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 47/2022 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1888 क्षिरसागर, मो. नं. 9823842188** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :–

**धर्माबाद :–** दिनांक 15.02.2020 ते दि. 03.12.2021 पावेतो, **मार्केट यार्ड कृषी उत्पन्न बाजार समिती ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व त्यांचे व्यापारी साक्षीदार यांचेकडुन ज्यांनी हरभरा खरेदी केला व फिर्यादीचे 15,49,827.86/–रूपये व त्यांचे सोबत इतर व्यापारी यांचेकडुन 67,64,707.79/–रूपये असा एकुण 83,14,556.23/–रूपये आठ दिवसात देतो म्हणुन दिले नाहीत. विश्वासघात करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी कुंदूरके नागानाथ विठ्ठलराव, वय 55 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शिक्षक कॉलनी धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 122/2022 कलम 420, 406, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पंतोजी, मो.नं. 9421761274** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)धर्माबाद :–** दिनांक 10.05.2022 रोजी चे 18.50 वा. चे सुमारास, **साईनाथ किस्ता गोड यांचे घराचे पाठीमागे मोकळया जागेत धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तीर्रट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 33,000/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री शिवप्रसाद माधवराव कत्ते, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 123/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/आबेद, मो.क्र. 9823027835** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड